सुविचार

**श्वास** घेणं आणि सोडणं ह्याला **जगणं** म्हणत नाहीत, प्रत्येक **श्वास** घेताना आसमंतातल्या **सुगंधाचा** प्रत्यय आला पाहिजे.

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १४६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०८ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## एकनाथ शिंदेंच्या उमेदवाराच्या पोटात चाकू भोसकला, हल्ल्याने मुंबईत खळबळ...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** सध्या मुंबईत महानागरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पाहोचला आहे. मतदानाचा दिवस जवळ येत असल्याने पूर्ण ताकदीने प्रचार केला जात आहे. विशेष म्हणजे रात्र आणि दिवस एक करून जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातोय. एकनाथ शिंदे यांच्या उमेदवारांनी तर पूर्ण ताकद लावली आहे. काहीही झालं तरी मुंबईत महायुतीचाच विजय झाला पाहीजे, असा चंगच एकनाथ शिंदे यांच्या पक्षाने बांधला आहे. असे असतानाच आता शिंदे यांच्या उमेदवारासोबत धक्कादायक घटना घडली आहे. प्रचारादरम्यान शिंदे यांच्या उमेदवारावर मोठा हल्ला झाला आहे. प्रचार करत असतानाच या उमेदवाराच्या पोटाच थेट चाकू भोसकण्यात आला आहे. या घटनेनंतर मुंबईत एकच खळबळ उडाली आहे. सध्या या उमेदवारावर उपचार सुरू आहेत.



**नेमका कोणावर हल्ला झाला?**

मिळालेल्या माहितीनुसार मुंबईतील एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार हाजी सालीन कुरेशी यांच्यावर हल्ला करण्यात आला. बांद्रा येथील ज्ञानेश्वर नगरात ते प्रचाराला गेले होते. मात्र अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला केला. हल्ले करताना आरोपीने कुरेशी यांच्या पोटात धारदार चाकू भोसकला. हा हल्ला झाल्यानंत कुरेशी यांना लगेच रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर महात्मा गांधी रुग्णालयात उपचार सुरू आहे. याआधी अशा हल्ल्याची काही प्रकरणं समोर आली आहेत. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

**इम्तियाज जलील यांच्या गाडीवरही हल्ला...**

एकीकडे मुंबईत कुरेशी यांच्यावर हा हल्ला झाल्याचे समोर आलेले असताना दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरातही असाच एक प्रकार आहे. येथे संभाजीनगरचे माजी खासदार तथा एमआयएम पक्षाचे नेते इम्तियाज जलील हे प्रचारासाठी गेले होते. परंतु त्यांच्या कारवर लोकांनी हल्ला केला. एमआयएम पक्षाच्याच कार्यकर्त्यांनी हा हल्ला केल्याचे बोलले जात आहे. जलील यांच्यासोबत असलेल्या लोकांना मारहाण करण्यात आल्याचेही म्हटले जात आहे. तसे काही व्हिडीओ समोर आले आहेत. ही घटना घडल्यानंतर इम्तियाज जलील तक्रार दाखल करण्यासाठी तुरुंगात गेले होते. दरम्यान, आचारसंहिता लागू असताना आणि प्रचाराच्या काळात हिंसेच्या घटना घडत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

## कोणीही माईका लाल आला तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, अमरावती :** महाराष्ट्रातील ज्या कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. सरकारची ही योजना राज्यातील महिलावर्गामध्ये चांगलीच लोकप्रिय ठरली आहे. या योजनेचा महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठा फायदा झाल्याचं समोर आलं आहे. दरम्यान विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू असताना महायुतीमधील काही नेत्यांनी लाडकी बहीन योजनेच्या सन्मन निधीमध्ये वाढ करून आम्ही या योजनेतील पैसे २१०० करू अशी घोषणा केली होती. मात्र राज्यात महायुतीचं सरकार येऊन एक वर्ष झालं आहे, अजूनही या योजनेचा सन्मानी निधी वाढवण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाहीये. आता या योजनेबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.

ज्या महिला या योजनेसाठी पात्र नव्हत्या, त्या देखील या योजनेचा लाभ घेत असल्याचं समोर आल्यानंतर सरकारने मोठं पाऊल उचललं होतं, ज्या महिला या योजनेसाठी पात्र नाहीत त्यांची नाव या योजनेतून वगळण्यात आली, तसेच ज्या महिला पात्र नसून देखील या योजनेचा लाभ घेत आहेत,



त्यांना आळा बसावा म्हणून सरकारने या योजनेसाठी ई केवायसी सुरू केली होती. ज्या महिलांनी ई -केवायसी केली आहे, त्यांनाच आता या योजनेचा लाभ मिळणार आहे. दरम्यान या योजनेतून गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणात लाभार्थी महिला वगळण्यात आल्यामुळे विरोधकांकडून ही योजना बंद पडणार असल्याचा आरोप केला जात आहे, त्यामुळे लाडक्या बहिणींचं देखील टेन्शन वाढलं आहे. विरोधकांच्या या आरोपाला आता एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिलं आहे, ते अमरावतीमध्ये बोलत होते.

लाडक्या बहिणींनी विधानसभा निवडणुकीत चमत्कार दाखवला आहे. मी गरिबी पहिली आहे. काटकसर पहिली आहे. काही लोक योजना बंद पाडण्यासाठी कोर्टात गेले, खोडा घालणाऱ्या लोकांना लाडक्या बहिणींनी जोडा हाणला आहे. कोणीही माईका लाल आला तरी लाडकी बहीण योजना बंद पाडू शकत नाही, अशी घोषणाच आता एकनाथ शिंदे यांनी प्रचारसभेत केली आहे.

## मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर पाच दिवस राहणार बंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, मुंबई :** मुंबईतील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र भाविकांना काही दिवस बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी थांबावे लागणार आहे. याचे कारण श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर हे १-२ दिवस नव्हे तर तब्बल ५ दिवस बंद राहणार आहे. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर प्रशासनाने जाहीर केले आहे की ७ ते ११ जानेवारीदरम्यान मंदिर दर्शनासाठी बंद राहणार आहे. हे बंद का ठेवले जाणार आहे, यामागचे नेमके कारण समोर आले आहे. का राहणार मंदिर बंद?

७ ते ११ जानेवारी या कालावधीत



मंदिरातील मुख्य मूर्तीवर पारंपरिक सिंदूर लेपन तसेच इतर आवश्यक धार्मिक विधी पार पाडले जाणार आहेत.

आहेत. सिद्धिविनायक मंदिर न्यासाने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार देश-विदेशातून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी आधीच माहिती देण्यात आली आहे. या काळात भाविकांना मूळ मूर्तीचे दर्शन घेता येणार नाही, मात्र प्रतिकृती मूर्तीचे दर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मंदिराच्या कार्यकारी अधिकारी वीणा पाटील यांनी भाविकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईतील सर्वाधिक श्रीमंत मंदिरांपैकी एक मंदिर मुंबईतील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर हे एक प्रमुख हिंदू तीर्थक्षेत्र आहे. १९ नोव्हेंबर १८०१ रोजी लक्ष्मण विठू आणि देउबाई पाटील यांनी या मंदिराची उभारणी केली होती. आज हे मंदिर मुंबईतील सर्वाधिक श्रीमंत मंदिरांपैकी एक मानले जाते. दरवर्षी होणाऱ्या सिंदूर लेपन विधीमुळे या काळात भाविकांची गर्दी अधिक वाढते, त्यामुळे काही दिवस मंदिर बंद ठेवण्याची परंपरा आहे.

## गोदाकाठचा क्रांतिसिंह काळाच्या पडद्याआड !

### शेकापचे ज्येष्ठ नेते भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांचे निधन

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०७, पालम (परभणी) :** शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, शेतकरी चळवळीतील लढवय्ये शिलेदार आणि गोदाकाठचा क्रांतिसिंह अशी ओळख असणारे भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांचे आज मंगळवारी दि.६ रात्री नऊ वाजता निधन झाले.



पुण्यातील मेडीकव्हर हॉस्पिटल येथे त्यांची प्राणज्योत मावळली. मृत्यू समयी त्यांचे वय ९५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात सून, विवाहित कन्या, जावई, पुतणे, नातवंडे असा मोठा संयुक्त परिवार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून भाई लक्ष्मणराव गोळेगावकर आजारी होते. पुणे येथे त्यांच्यावर उपचार चालू होते. उपचार चालू असतानाच त्यांची प्राणज्योत मावळली. भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांच्या निधनाने जिल्ह्यात सहा दशके शेतकऱ्यांसाठी संघर्षशील असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा अंत झाला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील जिल्ह्यातल्या बहुतांश लढ्यांचे नेतृत्व त्यांनी केले. आयुष्यभर शेतकरी कामगार पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या भाई गोळेगावकर यांनी मराठवाडा केसरी भाई अण्णासाहेब गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षात आपल्या कारकीर्दीला प्रारंभ केला. पुढे शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस व राज्याचे खजिनदार अशा जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ते दीर्घकाळ संचालक व उपाध्यक्ष होते. ग्रामीण भागात शिक्षणाची चळवळ रुजावी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी यासाठी त्यांनी बळीराजा शिक्षण संस्थेची स्थापना केली.

आज या शिक्षण संस्थेचा मोठा विस्तार असून हजारो विद्यार्थी संस्थेच्या विविध शाळांमध्ये अध्ययन करत असून शेकडो शिक्षक या संस्थेत कार्यरत आहेत. अत्यंत परखड शैलीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या भाई गोळेगावकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवताना कधीही तडजोड केली नाही. त्या त्या काळातल्या प्रस्थापित राजकीय सत्ता व प्रशासनाशी त्यांनी कायम संघर्षाची भूमिका घेतली. 'राष्ट्रीयरत्न' या उपाधीने त्यांना गौरविण्यात आले होते.

## बदलापुरातील कंपनीत ८ ते १० स्फोट!

### अग्निशामक दलाच्या १० गाड्या घटनास्थळी दाखल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, ठाणे :** राज्यभरात महापालिका निवडणुकांचा धुराळा सुरु आहे. राज्यातील २९ मोठ्या शहारांमध्ये महापालिकांची धामधूम सुरु आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज निवडणुकांच्या प्रचाराच्या निमित्ताने ठाणे जिल्ह्यात आहेत. पण मुख्यमंत्री ठाणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतानाच ठाण्यातील एक अनपेक्षित घटना समोर येत आहे.

ठाण्यातील बदलापूर शहरात एक दुखद आणि दुर्देवी घटना समोर येत आहे. बदलापूरमध्ये एका कंपनीत मोठे स्फोट झाले आहेत. या स्फोटामुळे परिसरात अत्यंत भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. सध्या घटनास्थळी पोलीस, पालिका प्रशासन, जिल्हा प्रशासन अग्निशामक दलाचे जवान घटानस्थळी दाखल झाले आहेत. परिस्थितीवर सध्या नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

बदलापूरच्या खरवई एमआयडीसीमध्ये एका कंपनीत मोठे स्फोट झाले आहेत. बदलापूर शहरात आज रात्री नऊच्या सुमारास जनजीवन सुरळीत सुरु



होतं. सकाळी ऑफिसला गेलेले नागरिक घरी परतले होते. तर अनेक जण रात्रीची शिफ्ट करण्यासाठी कामावर जात होते. प्रत्येक जण आपापल्या कामात व्यवस्त होतं. कुणी आपापल्या घरी आपापल्या कामात बिझी होतं. काही जण घरात टीव्ही पाहत होते. काही जण घरात जेवण करत होते. अनेक जण विश्रांती घेत होते. कुणी झोपलं होतं. रात्रीची वेळ असल्याने शहर आता शांततेकडे झुकत होतं. पण असं असताना अचानक मोठे स्फोट झाले. या स्फोटाने संपूर्ण शहर हादरलं आहे.

खरवई एमआयडीसी परिसरात पॅसिफिक केमिकल कंपनी आहे. याच कंपनीत आज मोठं संकट ओढावलं आहे. कंपनीत शॉर्ट सर्किट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या शॉर्ट सर्किटनंतर कंपनीत मोठमोठे स्फोट झाले. या स्फोटाच्या आवाजाने जमीन मोठ्या प्रमाणात हादरली. परिसरातील नागरीक भयभीत होऊन नेमकं काय झालं? हे पाहण्यासाठी बाहेर आले. विशेष म्हणजे स्फोटांची मालिका ही सुरुच होती. यावेळी तब्बल ८ ते १० मोठे स्फोट झाल्याची माहिती आहे.

पॅसिफिक कंपनीतील स्फोटानंतर कंपनीत मोठी आग लागली. आगीचे धग इतके मोठे आहेत की, आजूबाजूच्या कंपन्यांनाही मोठा धोका निर्माण होण्याची भीती आहे. घटनेचं गांभीर्य ओळखून अग्निशामक दलाच्या ८ ते १० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. परिसरात धुराचे मोठे लोट हवेत मिसळताना दिसत आहेत. पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव संबंधित परिसर पूर्णपणे खाली केला आहे. या घटनेत जीवितहानी झालीय का? ते अद्याप समजू शकलेलं नाही.

## 'समृद्धी'वर लक्झरी पेटली; ३६ प्रवासी बचावले

**दि.०७, बुलढाणा :** नागपूर येथून नाशिककडे निघालेली लक्झरी बस शॉर्टसर्किट होऊन लागलेल्या आगीत जळून खाक झाली. मंगळवारी पहाटे अडीच वाजताच्या सुमारास समृद्धी महामार्गावर मेहकरजवळील शिवणा पिसा शिवारात ही घटना घडली. वाहनातून धूर येत असल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत बस थांबवून वेळीच उतरविल्याने ३६ प्रवाशांचे प्राण वाचले. खाली उतरल्यानंतर सुटकेचा श्वास घेतलेल्या प्रवाशांच्या डोळ्यांसमोर जळत असलेली लक्झरी बस पाहून थरकाप उडाला. किर्र अंधारात प्रवासी जिवाच्या आकांताने गोंधळून गेले होते. समृद्धी महामार्गावर १ जुलै २०२३ला लक्झरी बस जळून २५ प्रवाशांचा अक्षरश: कोळसा झाला होता. हृदय पिळवटून टाकणारी ही घटना मृत्यूचे तांडव काय असते, याचा प्रत्यय देऊन गेली होती. परंतु आजच्या घटनेत चालकाने समयसूचकता दाखविल्याने पुनरावृत्ती टळली.

एमएच-४०-सीटी-८०४३ क्रमांकाची खुराणा ट्रॅव्हल्सची लक्झरी बस शिर्डी व नाशिक येथील प्रवाशांना घेऊन नागपूरहून निघाली होती. मेहकर तालुक्यातील शिवणी पिसा शिवारात पोहोचल्यानंतर पहाटे अडीच वाजताच्या सुमारास चालक वाहिद शेख (वय ३६) रा. नागपूर याला बसच्या चाकाकडून धूर येत असल्याचे समजले. त्याने क्षणात मुंबई कॉरिडोरवरील चॅनल क्रमांक ३००.१ वाहन थांबवून तपासणी केली आणि दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेत ३६ प्रवाशांना तत्काळ खाली उतरविले. त्यानंतर काही क्षणातच बसने पेट घेतला. वायरिंगमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने ही आग लागल्याने चालकाने सांगितले.

# शहरांतील वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण हवेच !

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०



२०२५ मध्ये अनेक उत्पादनांवरील जीएसटी कर कमी झाल्याने त्यांची खरेदी वाढली. वाहनांवरील जीएसटीही कमी झाल्याने या वर्षात लोकांनी मोठ्या प्रमाणात वाहने खरेदी केली. २०२५ मध्ये राज्यात ३२.३८ लाख वाहनांची नोंदणी झाली. २०२४ च्या तुलनेत हा आकडा १३.५५ टक्यांनी अधिक आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक वाहनांची नोंद झाली असून यावेळी पुण्याने मुंबईलाही मागे टाकले. केवळ पुण्यात २. ११ लाखाहून अधिक दुचाकी खरेदी केल्या गेल्या. १५ वर्षाहून जुने व्यावसायिक वाहन आणि २० वर्षांहून अधिक जुने खासगी वाहन असेल तर त्याचे फिटनेस प्रमाणपत्र काढून गाडया वापरण्याची मुभा देण्यात आली आहे. ज्या प्रमाणात रस्त्यावरील वाहने वाढत आहेत त्या तुलनेत ती स्क्रॅप केली जात नाहीत त्यामुळे वाहनांचा समतोल राखला जात नाही. शहरांसारख्या ठिकाणी रस्त्यांची मर्यादित लांबी रुंदी, पार्किंगसाठी उपलब्ध जागा आणि सध्या चालू असणारी विकासकामे पाहता वाढती वाहनसंख्या भविष्यात शहरांतील जीवनमानावर गंभीर परिणाम करू शकते.

आपल्याही दारात आपली स्वतःची गाडी असावी असे प्रत्येक व्यावहारिक माणसाचे स्वप्न असते. दरवर्षी गुढीपाडवा, दसरा आणि दिवाळी या सणांना मोठ्या प्रमाणात वाहने खरेदी केली जातात. शहरांत पूर्वी सर्वच गाड्या पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या असत, त्यानंतर सीएनजीचा पर्याय आला. इंधनखर्च वाचावा म्हणून लोकांनी आपल्या जुन्या गाड्या विकून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या खरेदी केल्या आता विजेवर म्हणजेच बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात येऊ लागल्या आहेत त्यामुळे लोकांकडून या गाड्यांना अधिक पसंती मिळू लागली आहे. टॅक्सी रिक्षा यांच्याप्रमाणे खासगी वाहनांच्या खरेदी विक्रीवर कोणतेच बंधन नसल्याने शहरातील वाढती वाहनसंख्या डोकेदुखी ठरू लागली आहे. शहरांतील वाढत जाणारी वाहनांची संख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागण्याची दाट शक्यता आहे.

लोकसंख्येच्या भस्मासुराने मुंबई, ठाणे, पुणे सारख्या शहरांना आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यांवर पडत आहे. यांवर पर्याय म्हणून सुरु केलेली मोनो आणि मेट्रो रेल्वेही कमी पडू लागल्या आहेत. आजमितीला शहरातील लोकांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवघेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य नोकरदारही स्वत:च्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे. व्यवसायासाठी घेतल्या जाणार्या रिक्शा-टॅक्सींसह, 'ओला', 'उबेर' 'रॅपीडो' यांसारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमांतून व्यवसाय करण्यासाठी विकत घेण्यात येणार्या वाहनांचीही दरवर्षी यांमध्ये भर पडत आहे. वाढत जाणार्या वाहनांच्या तुलनेत मुंबई-ठाण्यातील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे. मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा दर असल्याने गाड्या उभ्या करण्यासाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या गाड्या वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे. दर वर्षी मुंबईतील वाहनांच्या संख्येत दोन ते तीन लाख वाहनांची भर पडते. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर वाढले असले तरी मुंबईकरांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल.

मुंबईत वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषत: लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुप्फुसांचे विकार जडत आहेत. शहरांत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यांत नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो. त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो. यांवर पर्याय म्हणून सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत अवजड वाहनांना मुंबईत प्रवेशबंदी करण्यात आली आहे. मात्र त्याचाही विशेष लाभ होताना दिसत नाही. मुंबईप्रमाणे नवी मुंबई, ठाणे, पुणे या प्रगतशील शहरांतही काहीशी अशीच परिस्थिती आहे. वाहनसंख्येची समस्या लवकरच रौद्र रूप धारण करू शकते. यासाठी राज्य प्रशासनाने चिंतन करून वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याचे आणि या भीषण समस्येविषयी लोकजागृती करण्याचे उपाय लवकरात लवकर शोधले पाहिजेत.

# पतंगराव नव्हे रॉकेटराव !



महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८२ वी जयंती. ८२ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते.

हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.

भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्द्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८२ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# गरिबीविरुद्ध लढा : मानवी वेदनांपासून सामाजिक न्यायापर्यंतचा संघर्ष

मानवी इतिहासात विविध संस्कृती, राज्यव्यवस्था आणि आर्थिक पद्धती उदयास आल्या, नष्ट झाल्या; परंतु गरिबी हा प्रश्न मात्र प्रत्येक काळात वेगवेगळ्या स्वरूपात टिकून राहिलेला दिसतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि प्रगतीच्या घोषणांमध्येही गरिबीचे अस्तित्व आजही वास्तव आहे. ०८ जानेवारी रोजी साजरा होणारा गरिबीविरुद्ध लढा दिन (थरअॅ प झेंशऔं ू) हा केवळ एखाद्या सामाजिक घटनेची आठवण करून देणारा दिवस नसून, तो समाजाच्या अंतःकरणाला प्रश्न विचारणारा आणि विकासाच्या संकल्पनेला पुन्हा तपासण्यास भाग पाडणारा दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, गरिबी ही केवळ पैशाच्या अभावाची समस्या नसून, ती मानवी प्रतिष्ठा, सामाजिक संधी, समानता आणि न्याय यांच्याशी निगडित असलेली एक खोल सामाजिक समस्या आहे.

गरिबीचा विचार करताना समाजशास्त्र तिच्याकडे एक बहुआयामी सामाजिक वास्तव म्हणून पाहते. गरिबी म्हणजे केवळ दोन वेळचे अन्न न मिळणे नाही; तर शिक्षण, आरोग्य, सुरक्षित निवारा, सन्मानजनक रोजगार, सामाजिक संरक्षण, आणि समाजातील निर्णयप्रक्रियेत सहभाग यांपासून वंचित राहणे होय. अनेक वेळा एखादी व्यक्ती गरीब असण्याचे कारण तिच्या वैयक्तिक क्षमतेपेक्षा ती ज्या सामाजिक रचनेत जन्माला येते, त्या रचनेतील असमानता असते. जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश आणि शिक्षण या घटकांवर आधारित भेदभावामुळे समाजातील काही गट कायमस्वरूपी गरिबीच्या कडेलोटावर उभे राहतात. म्हणूनच गरिबी ही वैयक्तिक अपयश नसून, ती सामाजिक व्यवस्थेतील अन्यायाचे प्रतिबिंब आहे.

भारतीय समाजाच्या संदर्भात गरिबीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आणि बहुआयामी आहे. भारतात आर्थिक विकासाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या, औद्योगिकीकरण झाले, शहरीकरण वाढले आणि सेवा क्षेत्र विस्तारले; मात्र या विकासाचा लाभ सर्वसामान्य माणसापर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. ग्रामीण भागात आजही शेतीवर अवलंबून असलेली कुटुंबे हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि कर्जबाजारीपणामुळे गरिबीत अडकलेली आहेत. दुसरीकडे शहरी भागात रोजगाराच्या संधी असल्या, तरी झोपडपट्ट्यांमधील जीवन, अपुऱ्या मूलभूत सुविधा, असुरक्षित कामकाज आणि सामाजिक संरक्षणाचा अभाव यामुळे शहरी गरिबीचे वेगळेच भयावह स्वरूप दिसून येते. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की गरिबी ही ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही पातळ्यांवर सामाजिक विकासाला मोठे आव्हान ठरते.

गरिबीचा सर्वाधिक फटका समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना बसतो. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक समुदाय, महिला, अपंग व्यक्ती आणि स्थलांतरित कामगार हे घटक सामाजिक व आर्थिक दोन्ही स्तरांवर असुरक्षित असतात. विशेषतः महिलांच्या बाबतीत गरिबीचे स्वरूप अधिक तीव्र असते. शिक्षणाच्या संधींचा अभाव, रोजगारातील भेदभाव, कमी मजुरी, असुरक्षित कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्यांचा भार यामुळे महिला दुहेरी शोषणाचा सामना करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे दिसते की महिलांचे सक्षमीकरण केल्याशिवाय गरिबीविरुद्धचा लढा यशस्वी होऊ शकत नाही.

गरिबीविरुद्ध लढा दिनाचे महत्त्व यासाठी अधोरेखित करावे लागते की हा दिवस समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देतो. विकासाचा अर्थ नेमका काय, हा प्रश्न हा दिवस उपस्थित करतो. केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढणे, मोठे प्रकल्प उभे राहणे किंवा आकडेवारीत सुधारणा होणे म्हणजे विकास नव्हे. खरा विकास तोच, ज्यामध्ये समाजातील शेवटच्या माणसाचे जीवनमान सुधारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ज्या समाजात संपत्ती काही मोजक्या लोकांकडे केंद्रीत होते आणि बहुसंख्य लोक मूलभूत गरजांसाठी संघर्ष करतात, तो समाज समतोल आणि न्याय्य ठरत नाही. म्हणून गरिबीविरुद्धचा लढा हा समतामूलक समाजनिर्मितीचा संघर्ष आहे.

शिक्षण हे गरिबीविरुद्धच्या लढ्यातील सर्वात प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीला रोजगाराच्या संधी मिळतात, सामाजिक जाणीव विकसित होते आणि आत्मविश्वास निर्माण होतो. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली गरिबीची साखळी तोडण्याची ताकद शिक्षणात आहे. मात्र गरीब कुटुंबांतील मुलांना शिक्षणापर्यंत पोहोचताना अनेक अडथळे येतात. आर्थिक अडचणी, बालमजुरी, शाळा सोडण्याचे प्रमाण, मुलींच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष आणि डिजिटल साधनांचा अभाव यामुळे शिक्षणातील विषमता वाढते. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, शिक्षणव्यवस्थेतील ही विषमता दूर करणे हे गरिबी निर्मूलनासाठी अत्यावश्यक आहे.

आरोग्य आणि गरिबी यांचा संबंधही अतिशय घनिष्ठ आहे. गरीब कुटुंबांमध्ये आजारपण हे केवळ शारीरिक त्रासापुरते मर्यादित न राहता, ते आर्थिक संकटाचे कारण ठरते. उपचाराचा खर्च, काम करण्याची क्षमता कमी होणे आणि दीर्घकालीन आजार यांमुळे कुटुंब अधिक गरिबीत ढकलले जाते. समाजशास्त्रीय अभ्यासातून हे स्पष्ट होते की सार्वत्रिक, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध झाल्यास गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. म्हणून सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेचा बळकटीकरण हा गरिबीविरुद्धच्या लढ्यातील महत्त्वाचा घटक आहे.

रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा गरिबीविरुद्धच्या संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. बेरोजगारी आणि अल्परोजगारी ही गरिबीची प्रमुख कारणे आहेत. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना कमी मजुरी, सामाजिक सुरक्षा नसणे आणि रोजगाराची अनिश्चितता यांचा सामना करावा लागतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, केवळ रोजगारनिर्मिती पुरेशी नसून, सन्मानजनक, सुरक्षित आणि टिकाऊ रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. कौशल्यविकास, स्वयंरोजगार, सहकारी चळवळी आणि स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योग यांमुळे आर्थिक स्वावलंबन वाढू शकते.

गरिबीविरुद्धच्या लढ्यात शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा, रोजगार हमी, निवारा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक समावेशनाच्या योजना गरिबांसाठी आधारस्तंभ ठरू शकतात. मात्र समाजशास्त्रीय अभ्यास सांगतो की योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी पारदर्शक अंमलबजावणी, प्रशासनाची संवेदनशीलता आणि लोकसहभाग अत्यावश्यक आहे. केवळ योजना जाहीर करणे पुरेसे नसून, त्या प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत.

स्वयंसेवी संस्था, सामाजिक चळवळी आणि स्थानिक समुदाय यांची भूमिका गरिबी निर्मूलनात अत्यंत मोलाची आहे. तळागाळातील गरजा ओळखून स्थानिक पातळीवर उपाययोजना राबविण्याची क्षमता या संस्थांकडे असते. महिला स्वयं-सहायता गट, ग्रामविकास उपक्रम, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम आणि सामाजिक उद्योजकता यांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे उपक्रम सामाजिक ऐक्य आणि सहभाग वाढवतात, जे दीर्घकालीन बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानालाही गरिबीविरुद्धच्या लढ्यात महत्त्वाचे स्थान आहे. डिजिटल सेवा, ऑनलाइन शिक्षण, थेट लाभ हस्तांतरण आणि माहितीपर पोहोच यांमुळे अनेक अडथळे कमी झाले आहेत. मात्र डिजिटल दरी ही नवीन सामाजिक विषमता निर्माण करत आहे. गरीब आणि वंचित घटकांना तंत्रज्ञानाचा समान लाभ मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत.

गरिबीविरुद्ध लढा दिन आपल्याला ठामपणे सांगतो की गरिबी निर्मूलन हा दयेचा नव्हे, तर हक्कांचा आणि न्यायाचा प्रश्न आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार हे मूलभूत मानवी हक्क आहेत. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाचे जीवनमान उंचावत नाही, तोपर्यंत विकास अपूर्णच राहतो.

अखेरीस, ०८ जानेवारी, गरिबीविरुद्ध लढा दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर कृतीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. गरिबी ही अटळ नियती नसून, ती मानवनिर्मित सामाजिक वास्तव आहे आणि त्यामुळे ती बदलण्याची ताकदही मानवाकडेच आहे. सामाजिक संवेदनशीलता, समतामूलक धोरणे, लोकसहभाग आणि मानवी मूल्यांवर आधारित विकासाच्या मार्गानेच गरिबीवर मात करणे शक्य आहे. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जिथे कोणतीही व्यक्ती उपेक्षित, वंचित किंवा दुर्लक्षित राहत नाही. गरिबीविरुद्धचा लढा हा एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता, तो आपल्या दैनंदिन सामाजिक जबाबदारीचा अविभाज्य भाग बनवणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## बाळकृष्णजी

बाळकृष्ण जांभेकर
दीपस्तंभ पत्रकारिते
गंगोत्री जणू ज्ञानाची
प्रवाहीत स्नेह सरिते

एल्फिन्स्टनचे पहिले
एतद्देशीय व्याख्याते
दहा भाषांवर प्रभुत्व
प्राप्त वैभव नैपुण्यते

प्राचीनलिपीअभ्यास
इतिहासकार जाणते
शिलालेखताम्रपटाचे
आपण समर्थ प्रणेते

मुद्रीत रूपा ज्ञानेश्वरी
जणू होय नव विधाते
ज्ञानाधिष्ठित समाज
श्रेयआपणासच जाते

गणितविज्ञान पांडित्य
कैक शास्त्राचे चाहते
कुलाबा वेध शाळेतले
अधिकारी होते चहिते

समाजमनाचाअभ्यास
जाणे प्रबोधन कोणते
दिशा दावी पत्रकारांना
पिढी धन्य तव ऋणते

अल्पायुष्य लाभे जरी
शतायुषी तुमचे गुण ते
अमर राहील शिकवण
सत्कर्म कर्तृत्वा गुणते

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अवैधरित्या पिस्टल बाळगणाऱ्या तरुणाला कोळसेवाडी पोलिसांकडून अटक




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०७, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीतील नेतीवली परिसरात अवैधरित्या पिस्टल बाळगून फिरत असलेल्या एका तरुणाच्या कोळसेवाडी पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. करण जितु निशाद (वय २१, व्यवसाय बेकार, रा.साई एन्कलेव्ह बिल्डिंग, देसलेपाडा, डोंबिवली पूर्व) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.नेतीवली परिसरात एक इसम पिस्टल घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकास मिळाली होती. त्या अनुषंगाने दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी नेतीवली, कल्याण पूर्व येथील जुन्या धान्य गोदामाजवळ सापळा रचून संशयित आरोपीस ताब्यात घेतले. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे अंदाजे २५ हजार रुपये किंमतीचे एक स्टील धातूचे पिस्टल आढळून आले. सदर पिस्टल दोन पंचांच्या साक्षीने जप्त करण्यात आले आहे.या प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १२/२०२६ अन्वये भारतीय हत्यार कायदा कलम ३ व २५ तसेच मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१) व १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप भालेराव करीत आहेत. ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) संजय जाधव, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-३ कल्याण अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमंत गुरव, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गणेश न्हायदे तसेच गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

## आज खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचा ३६ वा वर्धापनदिन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** महानिर्मितीच्या खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचा ३६ वा वर्धापन दिन गुरुवार, दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी पूजा, अर्चना व विविध कार्यक्रमांतर्गत उत्साहात साजरा करण्यात येत आहे. याप्रसंगी सायंकाळी ७ वाजता औष्णिक वीज केंद्राच्या वसाहतीतील गोल बाजार चौक येथे सांस्कृतिक कार्यक्रम व वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध खेळामधील विजेत्यांना पारितोषिके वितरण सोहळा आयोजित असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक व अध्यक्ष राधाकृष्णन बी. हे राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून महानिर्मितीचे (स्वतंत्र) संचालक विश्वास पाठक, महानिर्मितीचे (संचलन) संचालक संजय मारुडकर, महानिर्मितीचे (प्रकल्प) संचालक अभय हरणे, महानिर्मितीचे वित्तीय संचालक मनेश वाघेरकर, महानिर्मितीचे (सं.व सु.-१) कार्यकारी संचालक राजेश पाटील, महानिर्मितीचे (सं.व सु.-१) कार्यकारी संचालक पंकज सपाटे, महानिर्मितीचे माहिती तंत्रज्ञान कार्यकारी संचालक नितीन चांदुरकर, महानिर्मितीचे पर्यावरण व सुरक्षितता कार्यकारी संचालक नितीन वाघ, महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजुरकर आदी मान्यवर उपस्थित राहतील. कार्यक्रमाला औष्णिक विद्युत केंद्राचे सर्व अभियंते, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार, कंत्राटदार यांचे सर्व कुटुंबीय व शुभचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमारभार यांनी केले आहे.

## महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण उद्या चंद्रपूरात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप - शिवसेना - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे उद्या चंद्रपूर दौऱ्यावर येत असून, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत तुकुम येथील चवरे मैदान येथे भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा उद्या दुपारी ३ वाजता सुरू होणार आहे. महायुतीच्या प्रचारात नवचैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या सभेत प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे केंद्र व राज्य सरकारच्या विकासात्मक धोरणांवर प्रकाश टाकत नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार्या विविध लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महायुतीची भूमिका आणि पुढील विकासदृष्टी ते यावेळी मांडणार आहेत. दुपारी २.३० वाजता मोरवा विमानतळ येथे त्यांचे आगमन होणार आहे. तर ३ वजाता सभेला सुरवात होणार आहे. या जाहीर सभेद्वारे चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीत महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. शहरातील विकासकामे, पायाभूत सुविधा, घरपट्टे, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, रोजगार आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही प्रदेशाध्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. या सभेसाठी महायुतीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

## आपले सरकार पोर्टल'वरील २ हजार ८४० तक्रारी निकाली

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०७, ठाणे :** राज्य सरकारने सुरू केलेल्या आपले सरकार २.० वरील तक्रारी निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे सामान्य प्रशासन विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. जिल्हा परिषदेस आपले सरकार पोर्टलवर २ हजार ८९५ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ हजार ८४० तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत तर फक्त ३८ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय स्तरावर विस्तृत अहवाल मागणीसाठी प्रलंबित आहेत. या पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारी ऑनलाइन दाखल करणे तसेच त्यांची सर्वस्थिती जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध असून ९८ टक्के तक्रारी निकाली काढण्यात यश मिळविले आहे. शासन निर्देशानुसार २१ दिवसांत तक्रारींचे निराकरण करणे अनिवार्य असून मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या येणाऱ्या तक्रारी सरासरी २१ दिवसांच्या आत निकाली काढण्यात येत असून सर्व विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. आपले सरकार पोर्टलवरील प्राप्त तक्रारींचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक सोमवारी साप्ताहिक सत्रात आढावा घेतला जातो. तक्रारदाराची तक्रार मांडणी व्यवस्थित न झाल्यास किंवा तक्रार समजण्यास अडचण असल्यास दूरध्वनीवर तात्काळ संपर्क केला जातो. तक्रारींचे निवारण ठाणे जिल्हा परिषदेकडून उत्तम प्रकारे  होत असून आतापर्यंत १०७२ तक्रारदारांनी आपले अभिप्राय नोंदविले असून त्यापैकी १०६८ तक्रारदार यांनी समाधान व्यक्त केले आहे, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांनी दिली.

## चंद्रपूरातील १६ हजार कुटुंबांना कायमस्वरूपी घरपट्टे मिळणार - चंद्रशेखर बावनकुळे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरातील नझूलधारकांना कायमस्वरूपी पट्टे देण्याची मागणी अधिवेशनात केली होती. ती पूर्ण करता येत असल्याचा आनंद आहे. चंद्रपूरातील ५५ झोपडपट्टी भागांतील १६ हजार घरांना आपण जागेचे कायमस्वरूपी पट्टे देणार असून, याची प्रक्रिया सुरू झाली आहे. चंद्रपूर विकासाच्या दिशेने गतिशील होत असताना भारतीय जनता पार्टीतील सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून देत ही गती दुप्पट करा, असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चंद्रपूरातील सभांना संबोधित करताना मतदारांना केले. भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आज सपना टॉकीज चौक, बाबुपेठ सिद्धार्थ नगर आणि इंदिरा नगर येथे जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी पालकमंत्री डॉ. प्रा.अशोक उईके, निवडणूक निरीक्षक चैनसुख संचेती, निवडणूक प्रभारी माजी खासदार अशोक नेते, शिवसेनेचे जिल्हा संघटक युवराज धानोरकर, जिल्हाध्यक्ष बंडू हजारे, जटपुरा प्रभागातील उमेदवार भाग्यश्री हांडे, छबू वैरागडे, रवी



लोणकर, प्रमोद क्षिरसागर, इंदिरानगर एम.ई.एल. प्रभागातील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निलेश गवळी, जितेश कुळमेथे, आशा देशमुख, सविता सरकार, इंडस्ट्रियल प्रभागातील उमेदवार राजलक्ष्मी कारंगल, सुनीता जैसवाल, महेश झीटे, चंद्रशेखर शेट्टी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रभागातील रमेश पुलीपाका, राजू तोडासे, प्रतिमा ठाकूर, लालपेठ कॉलरी प्रभागातील उमेदवार कल्पना बबुलकर, ज्योती गेडाम, सविता कनकम, बाबुपेठ प्रभागातील रमेश दुयोर्धन, अश्विनी पिंपळशेंडे, श्रुती ठाकूर, प्रदीप किरमे आदी उमेदवारांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना काँग्रेसवर आरोप करताना ते म्हणाले की, काँग्रेस तोडांचे वाफारे सोडणारा पक्ष आहे. विकासाचे व्हिजन त्यांच्याकडे नाही. तुमच्या मतांचे दान घेऊन ते पडून जातील; मात्र आ. किशोर जोरगेवार यांनी आपली मते कर्जस्वरूपात घेतली आहेत. विविध विकासकामांच्या माध्यमातून ते कर्ज फेडण्याचे काम करत आहेत. त्यामुळे त्यांच्या हाताला अधिक बळ देण्याची गरज आहे. आपण चंद्रपूरातील घरांचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करून मॅपिंग करणार आहोत. यासाठी लागणारा खर्च नागरिकांना करावा लागणार नसून तो शासन करणार आहे.

प्रत्येक घराचे स्वामित्व, नकाशा आणि प्रॉपर्टी कार्ड आपण नागरिकांना मोफत देणार आहोत. ब्ल्यू लाईनमध्ये असलेल्या घरांना मंजुरी देण्याचा निर्णय आपण घेतला आहे. चंद्रपूरातील विकासाच्या गाडीला जोमाने चालवण्यासाठी यात भाजपचा महापौर चालक म्हणून असायला हवा. केंद्रातील ५५ योजना, राज्य सरकारच्या ४८ योजना, डीपीसीच्या २२ योजनांचा नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रत्येक प्रभागात भारतीय जनता पार्टीच्या सेवाभावी नगरसेवकांची आवश्यकता असल्याचे ते यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आपण चंद्रपूरात १५ हजार घरे बांधून देणार असून ५० महिला बचत गटांना ५० लाख रुपयांचे अनुदान देणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगर कार्यालयाचे ना. बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन गांधी चौकात नव्याने सुरू करण्यात आलेल्या भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगरच्या जनसंपर्क कार्यालयाचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या करण्यात आले. घरपट्टे मिळालेल्या नागरिकांकडून ना. बावनकुळे यांचे स्वागत चंद्रपूरात कायमस्वरूपी घरपट्टे देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अनेक नागरिकांना पट्टे वाटप करण्यात आले असून, पट्टे मिळालेल्या नागरिकांकडून घुटकाळा येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार व्यक्त करत स्वागत करण्यात आले. ही सुरुवात असून चंद्रपूरात आपण १६ हजार नागरिकांना कायमस्वरूपी पट्टे देणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

## अवैध मुरूम तस्करांचा महिला, वन अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** पंढरपूर वनपरिक्षेत्रातील मौजे खरातवाडी (गट नं. २८०) येथे दि.०६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास शासकीय कर्तव्य बजावत असताना वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) शितल बालाजी चाटे यांच्यावर मुरूम माफियांकडून अंगावर टिपर घालून प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. चाटे यांनी वेळेत बाजुला उडी मारल्याने त्या बचावल्या आहेत. करकंब पोलीस ठाण्यात या प्रकरणी चार आरोपीवर भारतीय न्याय संहिताच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, वनपरिक्षेत्र अधिकारी शितल चाटे, वनपाल बापूराव शंकरराव भोई हे गस्तीवर होते. तेव्हा त्यांना खरातवाडी वनक्षेत्रातून ३ टिपर अवैध गौण खनिज (मुरूम) भरून जाताना आढळले. यातील एका टिपरचा क्रमांक (एमएच-१६-एवाय ६८१६) होता. तर दोन टिपर विना-नंबर प्लेट होते. श्रीमती चाटे यांनी सदर वाहने थांबवून, मी वनपरिक्षेत्र अधिकारी आहे असे स्पष्ट सांगून वाहनचालकास स्वतःचा परिचय करून दिला. तसेच वाहन चालकांकडे परवान्याची मागणी केली. तेव्हा त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

या वाहनांमध्ये अवैध मुरूम असल्याचे निष्पन्न झाल्याने, ती जप्त करून वन कार्यालयात नेण्याचे आदेश देण्यात आले. वाहने जप्त करून नेत असताना, आरोपी सिद्धार्थ चंद्रकांत नाईकनवरे (रा. व्होळे ता. पंढरपूर) याने बनाव करून टिपर थांबवला. अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, त्याने वनविभाग तुमच्या बापाचा नाही अशा अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्याचवेळी, तोंडाला रुमाल बांधलेला एक अनोळखी इसम तिथे आला. श्रीमती चाटे यांनी त्यालाही आपली ओळख पत्र दाखवून परिचय दिला. तरीही त्याने वाद घालत श्रीमती चाटे यांचा मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. तर अनोळखी इसमाने गाडी चालू केली. श्रीमती चाटे यांनी गाडी न हलवण्याबाबत कायदेशीर समज दिली. तरी देखील आरोपीने तुम्ही बाजूला व्हा, नाहीतर मी टिपर तुमच्या अंगावर घालीन अशी उघड धमकी दिली. त्यानंतर जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याने मुरूमाने भरलेला भरधाव टिपर श्रीमती चाटे यांच्या अंगावर घातला.

यावेळी श्रीमती चाटे यांनी प्रसंगावधान राखून बाजूला उडी घेतल्याने त्या या भीषण हल्यातून थोडक्यात बचावल्या. सुदैवाने त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही, मात्र आरोपींनी शासकीय जप्तीतील वाहने घेऊन पळ काढला.

या प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी शितल चाटे यांच्या फिर्यादीवरून करकंब पोलीस ठाण्यात  सिद्धार्थ चंद्रकांत नाईकनवरे (रा.व्होळे, ता.पंढरपूर), चंद्रकांत बाळासाहेब घोडके (रा.व्होळे, ता.पंढरपूर) आणि दोन अनोळखी इसम यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड हे करीत आहेत.

---------------------------------------

या प्रकरणी वनविभागामार्फत वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. वन अधिकारी आणि कर्मचारी आपले कर्तव्य बजावताना अशा हल्यांना भीक घालणार नाहीत. अवैध व्यवसायांवर कडक कारवाई सुरूच राहील, असा संदेश वन विभागाने दिला आहे.

## अरुण धोटे यांचा नगराध्यक्षपदी पदग्रहण सोहळा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राजुरा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी नवनिर्वाचित अरुण धोटे यांनी नगरपरिषद सभागृह, राजुरा येथे दि. ०६ जानेवारी ला अधिकृतपणे पदभार स्वीकारला. उत्साह, जल्लोष आणि मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत पार पडलेला हा पदग्रहण सोहळा राजुरा शहराच्या राजकीय व प्रशासकीय वाटचालीतील एक महत्वाचा टप्पा ठरला. या गौरवपूर्ण सोहळ्याला नगरविकास आघाडीचे शिल्पकार, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. सुभाष धोटे, शेतकरी संघटनेचे नेते माजी आ. ॲड. वामनराव चटप, यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय नगरविकास आघाडीतील प्रमुख नेते, पदाधिकारी व सर्व नवनिर्वाचित नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची औचित्य अधिकच खुलले. पदग्रहण सोहळ्यापूर्वी नवनिर्वाचित नगराध्यक्ष अरुण धोटे यांनी कॅांग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ.सुभाष धोटे व कार्यकर्त्यांसह राजुराचे आराध्य दैवत भवानी माता मंदिर येथे दर्शन घेऊन आशिर्वाद घेतला. यावेळी उपाध्यक्षपदी दिलीप मुर्लीधर डेरकर यांची निवड करण्यात आली., तर स्वीकृत सदस्य म्हणून एजाज अहमद व किशोर हिंगाने यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

पदग्रहण सोहळ्याला मुख्याधिकारी विवेक चौधरी, यांचेसह कॅांग्रेसचे तालुकाध्यक्ष रंजन लांडे, हरजितसिंग संधू, शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष ॲड. दिपक चटप, तालुकाध्यक्ष कपिल इददे, राजेंद्र डोहे, यांच्यासह नगरसेवक गजानन मोहुर्ले, सिद्धार्थ पथाडे, मंगला पुरुषोत्तम मोकळे, पोर्णिमा सोयाम, ईश्वर ठाकरे, नीता बानकर, फरीना शाहीर सय्यद, इंदूबाई निकोडे, रमेश नळे, पुनम गिरसावळे, वनमाला बतकमवार, संध्या चांदेकर, अनंतकुमार ताजने, अन्नू हरजितसिंग संधू, गीता पथाडे, शेख मोहम्मद जुबेर मो. इस्माईल, यांच्यासह नगरविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व राजुरा शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी नुतन नगराध्यक्षांकडून शहर विकासाची नवी दिशा, लोकाभिमुख व पारदर्शक कारभार, तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## आळंदीत पत्रकार दिन माऊलींच्या चरणी नतमस्तक; सिध्दबेटात अजानवृक्षाची पूजा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, आळंदी (पुणे) :** हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाच्या वतीने 'पत्रकार दिना'चे औचित्य साधून तीर्थक्षेत्र अलंकापुरीत विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात माऊलींच्या पादुकांचे पूजन आणि सिद्धबेटात अजानवृक्ष पूजा करीत वृक्ष संवर्धनाचा संकल्प करून पत्रकार बांधवांनी हा दिवस साजरा केला. माऊलींच्या चरणी वेदमंत्रांचा जयघोष करत मंगलमय वातावरणात सकाळी ७ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात माऊलींच्या चल पादुकांची पूजा करण्यात आली. वेदमूर्ती प्रफुल्ल प्रसादे यांच्या पौरोहित्याखाली वेदघोषाच्या स्वरात हा विधी संपन्न झाला. यावेळी श्रींचे दर्शन घेऊन श्री गणेश मंदिर मंडप येथे आरती करण्यात आली. हुतात्मा राजगुरू पत्रकार संघ अध्यक्ष अर्जुन मेदनकर, जिल्हा प्रतिनिधी अमर गायकवाड यांनी उपक्रमाचे संयोजन केले. या वेळी पत्रकारांनी समाजहिता साठी आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेसाठी माऊलींकडे आशीर्वाद मागितला. मंदिरातील पूजेनंतर सकाळी आठ वाजता पत्रकार बांधवांनी श्री संत लीला भूमी सिद्धबेट येथे भेट दिली. या ठिकाणी पवित्र अजानवृक्षाची पूजा करण्यात आली. सिद्धबेटाची पाहणी करतानाच निसर्ग संवर्धन आणि वृक्ष संगोपना बाबत उपस्थित मान्यवरांमध्ये सविस्तर चर्चा झाली. पत्रकारिता करतानाच सामाजिक उत्तरदायित्व म्हणून पर्यावरण रक्षणासाठी कार्य करण्याचा निर्धार गेल्या चार वर्षा पूर्वी करण्यात आला होता. त्या कामाची माहिती यावेळी अर्जुन मेदनकर यांनी देत सिद्धबेट येथे वृक्षारोपण, संवर्धन, पर्यावरण रक्षणाचे कार्य सुरू आहे. येत्या काळात ५ हजार वृक्ष लावण्यात येत असून यासाठी तयारी नियोजन सुरु आहे. येथील हरित संपदा संवर्धन होणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांचे स्वागत आणि पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाच्या वतीने आलेल्या पाहुण्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. आळंदीतील कार्यक्रमा नंतर पत्रकार नियोजित मुंबई दौऱ्यासाठी रवाना झाला. या उपक्रमामुळे पत्रकारिते सोबतच अध्यात्म आणि पर्यावरण रक्षणाचा एक सुंदर संगम आळंदीत पाहायला मिळाला.

# विसापुरात भूमिगत रेल्वे मार्गादरम्यान अपघातप्रवण खड्डा

## मध्य रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष; वाहन चालकांना करावा लागतो अडचणीचा सामना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यात सर्वात मोठे विसापूर गाव आहे. हे गाव रेल्वे मार्गामुळे विभागले आहे. गावातील वाहन चालकांना ये–जा करण्यासाठी अंडरपास (भूमिगत) मार्ग रेल्वे प्रशासनाने तयार केला आहे. मात्र, ऐन वळणावर भला मोठा खड्डा पडला आहे. याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून वाहन चालकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. विसापुरातील रेल्वे भूमिगत रेल्वे मार्गादरम्यान खड्डा अपघातप्रवण असल्याने अपघाताची शक्यता बळावली आहे.

सदर मार्ग सुरळीत करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. अन्यथा रेल्वे रोको आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर गावातून तीन रेल्वे मार्ग गेले आहेत. चौथ्या रेल्वे मार्गाचे काम केले जात आहे. पुन्हा पाचवा रेल्वे मार्ग प्रस्तावित आहे. १८ हजारांवर लोकसंख्या असलेल्या गावाची विभागणी रेल्वे मार्गामुळे झाली आहे. गावातील नागरिकांना व वाहनचालकांना आवागमन करण्यासाठी भूमिगत रेल्वे मार्ग तयार करण्यात आला. मात्र एका बाजूने रेल्वे अंडरपास (भूमिगत) रस्त्याची अवस्था अंत्यत दयनीय झाली आहे. ऐन वळणावर मोठा खड्डा पडला असून त्यातून लोखंडी सळाखी बाहेर पडल्या आहे. यामुळे वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे.

विसापूर येथील अंडरपास (भूमिगत) रेल्वे मार्गाची समस्या निकाली काढण्यासाठी मध्य रेल्वे विभाग व जिल्हाधिकारी यांना ग्रामपंचायत मार्फत निवेदन सादर करून अवगत करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात अधिकाऱ्यांना पाठवून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. मात्र, अद्याप रेल्वे मार्गादरम्यान अपघातप्रवण खड्डा व रेल्वे मार्गाची दुरावस्था दूर झाली नाही. परिणामी गावकऱ्यांचा असंतोष वाढला आहे.

गावकऱ्यांनी भूमिगत रेल्वे मार्गाची दुरावस्था दूर झाल्याने रेल्वे रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यावर रेल्वे प्रशासन काय मार्ग काढते, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



विसापूर गाव रेल्वे मार्गामुळे विभागले आहे. रेल्वे मार्गाची दुरावस्था मध्य रेल्वे विभाग व जिल्हाधिकारी यांना ग्रामपंचायत मार्फत निवेदन सादर करून समस्या दूर करण्याची विनंती केली. आजघडीला जडवाहनाच्या आवागमनमुळे भूमिगत रेल्वे मार्ग दरम्यान वळणावर मोठा खड्डा पडला आहे. यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. रेल्वे प्रशासनाने तातडीने रेल्वे मार्गाची दुरावस्था दूर करावी. त्याच प्रमाणे येथील गोंडवाना हाल्ट रेल्वे स्टेशन वर नागरिकांना ये – जा करण्यासाठी पादचारी पुलाची निर्मिती करावी, अशी ग्रामपंचायतीची आग्रही मागणी आहे. गावकऱ्यांच्या आंदोलनाला आमचे सहकार्य राहणार आहे.

**– अनेकश्वर मेश्राम, उपसरपंच ग्रामपंचायत, विसापूर**

# निफाड भूमी अभिलेख कार्यालयातील ‘भूकरमापक’ एसीबीच्या जाळ्यात

## ३५ हजारांची लाच घेताना रंगेहात अटक

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** मोजणीचा नकाशा देण्यासाठी ३५ हजारांची लाच; निफाडचा भूकरमापक एसीबीच्या जाळ्यात आडगाव शिवारात हॉटेल जत्रा पॉईंटजवळ कारवाई निफाड येथील भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत असलेल्या एका वर्ग–३ च्या भूकरमापकाला ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात अटक केली आहे. दिनेश शिवनाथ झुंजारे असे या लाचखोर कर्मचाऱ्याचे नाव असून, शेतजमिनीचा नकाशा देण्यासाठी त्याने ही रक्कम स्वीकारली होती. या कारवाईमुळे महसूल व भूमी अभिलेख विभागात खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार राहुल ढोमसे यांनी त्यांच्या वहिनी प्रतिभा साळुंखे/ढोमसे यांच्या नावावरील मौजे गोरठाण येथील शेतगट क्रमांक १३६ मधील ५७ आर क्षेत्राची हद्द कायम करण्यासाठी मोजणीचा अर्ज केला होता. १३ ऑगस्ट २०२५ रोजी निफाडच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात अर्ज केल्यानंतर, १७ सप्टेंबर २०२५ रोजी पंचांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष मोजणीही पार पडली. मात्र, मोजणी होऊन महिने उलटले तरी नकाशा मिळत नव्हता. तक्रारदाराने वारंवार कार्यालयात फेऱ्या मारून नकाशाची मागणी केली, परंतु दिनेश झुंजारे याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अखेर, ६ जानेवारी २०२६ रोजी झुंजारे याने तक्रारदाराला फोन करून तुमचा नकाशा तयार आहे, तो हवा असल्यास ३५ हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी केली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने तातडीने नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली.

एसीबीने तक्रारीची पडताळणी करून बुधवारी (दि.०७) सकाळीच सापळा रचला. आडगाव शिवारातील हॉटेल जत्रा पॉईंट जवळील एका अमृततुल्य चहा दुकानाच्या शेजारी ठरल्याप्रमाणे व्यवहार झाला. झुंजारे याने पंचांसमक्ष ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे, प्रभाकर गवळी, संदीप हांडगे व चव्हाण यांच्या पथकाने केली. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रतिभा आबुज करीत आहेत.

### मोजणी होऊन ही नकाशासाठी अडवणूक

शेतकऱ्यांनी शासकीय फी भरून मोजणी केल्यानंतर ही वेळेत नकाशा मिळत नाही, अशा अनेक तक्रारी आहेत. या प्रकरणात सप्टेंबर २०२५ मध्ये मोजणी झाली होती. तरीही जानेवारी २०२६ पर्यंत नकाशा अडवून ठेवण्यात आला होता. केवळ लाचेच्या हव्यासापोटी शेतकऱ्यांची अशी अडवणूक होत असल्याचे या कारवाईतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# आदिवासी वीर शहीद स्मारक नानिवली येथे अभिवादन कार्यक्रम

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, डहाणू (पालघर) :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिश सत्तेविरोधात लढताना हौतात्म्य पत्करलेल्या आदिवासी वीर शहीदांच्या स्मरणार्थ पालघर जिल्ह्यातील नानीवली (ता.जि.पालघर) येथे आदिवासी वीर शहीद स्मारक उभारण्यात आले आहे. सन १९४५ मध्ये नानीवली येथे ब्रिटिश सत्तेविरोधात लढताना शहीद झालेल्या वीर आदिवासी लढवय्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी दरवर्षी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात हजारो क्रांतिकारकांनी आपले प्राण अर्पण केले. इतिहासकारांनी अनेक स्वातंत्र्यसेनानींची नावे इतिहासाच्या पानांवर नोंदवली असली तरी आदिवासी समाजाने दिलेल्या बलिदानाकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष झाले. इस्ट इंडिया कंपनीच्या काळापासूनच आदिवासी समाजाने ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेविरोधात संघर्ष केला. तथापि, या संघर्षात शहीद झालेल्या अनेक आदिवासी वीरांची नावे इतिहासात अपेक्षित स्थान मिळवू शकली नाहीत.

सन १७०० ते १९४७ या कालखंडात आदिवासी समाजाने ब्रिटिश सत्तेविरोधात सातत्याने उठाव केले.



बाब्या तिलका मांझी यांचे पहाडी आंदोलन, राघोजी भांगरे यांचा सशस्त्र संघर्ष, सिद्धो–कान्हो यांचे उठाव, फुलो–झानो मुर्मू यांचे योगदान, बिरसा मुंडा यांचे उलगुलान, ताना भगत आंदोलन, कोल बंड, वासुदेव आंदोलन, तसेच वडोदरा, खानदेश, रत्नागिरी, ठाणे व पालघर परिसरातील अनेक आदिवासी उठाव या लढ्यांचे साक्षीदार आहेत.

पालघर जिल्ह्यात सन १९४५ ते १९४७ या कालावधीत ब्रिटिश सत्ता, जमीनदार, सावकार आणि गुलामगिरीविरोधात आदिवासी समाजाने मोठा संघर्ष उभारला. ११ ऑक्टोबर १९४५ रोजी शहीद वीर जेठ्या गांगड यांच्या नेतृत्वाखाली गुजरातमधील उंबरगाव तालुक्यातील तलवाडा येथे ब्रिटिशांविरोधात लढताना शेकडो आदिवासी वीर शहीद झाले. त्यानंतर ७ जानेवारी १९४७ रोजी पालघर जिल्ह्यातील नानीवली येथे शेतकरी, सावकार व जमीनदारांच्या अन्यायाविरोधात उभ्या राहिलेल्या आदिवासींवर ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबारात शेकडो आदिवासी वीरांना हौतात्म्य पत्करावे लागले. या शहीदांच्या स्मृती जपण्यासाठी नानीवली येथे आदिवासी वीर शहीद स्मारक स्थापन करण्यात आले आहे. दरवर्षी ७ जानेवारी २०२६ रोजी येथे शहीद वीरांना अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आदिवासी एकता परिषदेचे डॉ. सुनिल पऱ्हाड, आदिवासी कातकरी संघटनेचे रमेश सवरा व हजारो आदिवासी कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी आदिवासी शहीद क्रांतिकारक यांच्या कार्याचा उजाळा दिला. हा कार्यक्रम आदिवासी वीर शहीद स्मारक समिती, पालघर यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

# शिवछत्रपती शिक्षक संघटने तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**


**दि.०६, मुंबई :** शिक्षण क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. तदवतच शिवछत्रपती शिक्षक संघटने तर्फे सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाचा कोकण विभागातील गुणवंत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न झाला. याबाबत सविस्तर माहिती अशी की, कोकण विभागाचे लोकप्रिय शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अंबरनाथ येथील महाराजा रॉयल रिसॉर्ट येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कोकण विभागातील उत्कृष्ट शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या तसेच गुणवंत, कर्तव्यनिष्ठ व प्रेरणादायी शिक्षकांचा यथोचित गौरवार्थ भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन अत्यंत आनंदाने करण्यात आले. माध्यमिक शाळेचे शिक्षक भरत वटाणे, सुरेश पाटील, शिवशंकर तेली, जनार्दन अठराबुद्धे, लीलाधर मोरे आणि मल्लिकार्जुन बाळगांव या कर्तव्यनिष्ठ शिक्षकांना आमदार महोदयांच्या शुभहस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. आकर्षक ट्रॉफी, प्रमाणपत्र, शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्कारचे स्वरूप होते. या पुरस्कार वितरण सोहळ्याला शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे मुंबई महानगरपालिका विभाग प्रमुख रविंद्र पाटील शिक्षक कल्याण, अंबरनाथ आणि बदलापूर शहरातील बहुतांशी शिक्षक हजर होते.

# थोडक्यात

## परिवहन विभागाचे ऑनलाइन प्रणालीतील कारभारावर नियंत्रण नाही

**अक्षराज : गणेश जाधव**



**दि.०७, नेरूळ (नवी मुंबई) :** मागील वर्षभर परिवहन विभागाच्या ऑनलाइन प्रणालीतील अनागोंदी कारभारामुळे महाराष्ट्रातील वाहन धारक पुरते वैतागले असून वाहन धारकांना व्ही एलटीडी व एस.एल.डी. अशा प्रकारच्या मशिन बळजबरीने ते ही या ऑनलाईन प्रणालीचा वापर करून भयानक म्हणजे, प्रत्येक व्हि एल टी डी, मशिनचे १२ ते १३ हजार रुपये व एस.एल.डी, मशिन मागे ६ ते ७ हजार रुपये, असा मोठा बिनकामाचा बोजा वाहन धारक सोसत आहेत. या संदर्भात मागील वर्षापासून नवी मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक संघटना व अनेक अभ्यासू व्यक्ती कायदेशिर लढा देत आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबईत ही असेच एक अभ्यासू व्यक्ती महत्व म्हणून अमरदीप सिंग,हे ही पुर्ण अभ्यास पुर्वक व हे कसे चुकीचे आहे. याची पुर्ण माहीती पुराव्यानिशी परिवहन विभागाला देत आहेत. परंतू अजून ही जबाबदारी झटकण्याच्या पलीकडे कोणतीही कारवाई परिवहन विभागाकडून झालेली नाही. आता २०२६ चालू झाल्यावर वाटत होते काही तरी मार्ग नक्की निघेल. परंतु नवीन वर्षाच्या सुरवातीलाच ऑनलाइन प्रणालीतील एक नवीन अनागोंदी त्रासदायक कारभार समोर उभा, ए.एफ.एम.एस, ए.टी.एस सेंटर असा अडथळा येत असून सर्व वाहनांच्या पासिंग अपॉइंटमेंट बंद आहेत. या संदर्भात परिवहन विभागाकडे विचारणा केली असता, ऑनलाइन प्रणालीतील बिगाड आहे, असे उत्तर भेटत आहे,मग प्रश्न हाच आहे की, ही ऑनलाईन प्रणाली नक्की चालवते कोण,

या ऑनलाईन प्रणालीच्या जाचातून वाहन धारकांची सुटका कोण आणि कधी करणार याचे उत्तर परिवहन विभागाने द्यावे. अन्यथा वेळप्रसंगी सर्व वाहने रस्त्यावर उभी करून या ऑनलाइन प्रणालीतील बोगस कारभाराचा निषेध केला जाईल असा कडक इशारा वाहन चालक, मालक प्रतिनिधी संघटना यांच्याकडून देण्यात आलेला आहे.

## मराठी पत्रकार दिनानिमित्त ठाण्यात मान्यवरांचा सन्मान

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०६, ठाणे :** मराठी वृत्तपत्राचे आद्य पत्रकार दर्पणकार यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून ठाणे येथील सा. ठाणे नवादुत यांच्या वतीने ‘पत्रकार दिन’ मराठी ग्रंथालय सभागृहात साजरा करण्यात आला. यावेळी समाजातील विविध श्रेत्रात ऊल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.भगवान केणी, शशिकांत नाईक (क्रीडाशिक्षक), डॉ.निता अडसुळ, डॉ.सुरेश घुगे, डॉ.प्रशांत सिनकर, दै.अक्षराज चे पत्रकार अनंत बोरसे, रघुनाथ सुरलकर (जेष्ठ पत्रकार), नाटककार दत्ताजी मोरे, दादासाहेब पाटील, रवि यादव (कवी, साहित्यिक), पोलिस उपनिरिक्षक श्री.घुगे आदी मान्यवर उपस्थित होते. सुरवातीला पाहुण्यांच्या हस्ते द्विपप्रज्लन करण्यात आले. त्यानंतर संपादक दिनेश जोशी यांनी पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सन्मानिय पाहुण्यांनी समयोचित मनोगत व्यक्त केल्यानंतर, शशिकांत नाईक सर, बापु कृष्णा पाटील, फिरोज पठाण, सौ. देवांगिनी केणी, शिवाजी आंग्रे, अनंत बोरसे, जनार्दन पाल, डॉ.आणि वकील प्रशांत सिनकर, विजय गायकवाड, नरेंद्र कसबे, डॉ.नेताजी मुळीक, डॉ.निता अडसुळ, सौ. देवांगिनी केणी, कु.कौशिक राजगुरू डॉ. व वकील अनिल गायकवाड, अँडव्होकेट पराग पोकळे, कु. रोहन आंद्रे, कुमारी सारिका तपकीरे, मनिषा सैनी, डॉ.सशांक घुगे, तेजस्वी चौधरी, सुरज राजभर, सदानंद कुलकर्णी आदी मान्यवरांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश घुगे यांनी केले तर दिनेश जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मुदखेड मध्ये मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पणदिन साजरा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.०७, मुदखेड (नांदेड) :** मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ०६ जानेवारी १८३२ रोजी मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. महाराष्ट्रात सर्वत्र दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने मुदखेड शहरात मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या फलकास पुष्पहार अर्पण करून बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर मुदखेड नगर परिषदेच्या वतीने नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ विशांती पाटील कदम यांच्या वतीने पत्रकारांना लेखणी व डायरी पुष्प देऊन स्वागत करण्यात आले पत्रकाराने शहर विकासासाठी अनेक उपयोजना सुचवून सकारात्मक बातम्या देऊन सहकार्य करण्याचे आवाहन नूतन नगराध्यक्षा विशांती कदम यांनी केले. यानंतर माधव पाटील कदम यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के, नगरसेवक संजय आऊलवार, संदिप मोडवान यांनी आपले विचार मांडले. माजी नगरसेवक कैलास गोडसे, अभियंता सुमित गोडसे यांनी जनसंपर्क कार्यालयात समस्त पत्रकारांना दस्ती लेखणी पुष्प देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. तसेच मुदखेड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या वतीने डायरी लेखणी पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. लोकमंगल मल्टिस्टेट बँकेच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आला. मुदखेड पोलीस ठाण्याचे पो.नि. यानी पत्रकारांच्या लेखनीतून समाजाला दिशा देण्याचे काम केले जाते शासन प्रशासन सुरळीत चालण्यासाठी लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचे महत्त्वपूर्ण काम असून पत्रकारांनी निर्भीडपणे कार्य करत राहावे पोलीस प्रशासन आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या दर्पण दिनाच्या कार्यक्रमात पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन पाशाभाई, ईश्वर पिन्नलवार जिल्हा सहसचिव, संतोष पाटील गाढे, जयराम वन्ने, उत्तम हनुमंते,रुखमाजी शिंदे साहेबराव गागलवाड, नामदेव राहेरे, अतिक अहेमद, दिनेश शर्मा, साहेबराव हौसरे, धम्मदाता कांबळे, अब्दुल रझाक, संतोष सावंत, शेख इरफान, संतोष दर्शनवाड,शेख शमशुद्दीन, मनोज कमटे, देवानंद गुंजाळ, आशिष कल्याने अमोल टेकले, हाफिज खुरेशी, म.हाकिम, पिराजी गाडेकर,अजय कांबळे, यासह आदींची उपस्थिती होती. सर्व नियोजित कार्यक्रमात सुरेख सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते जिल्हा संघटक यांनी केले. दर्पण दिनानिमित्त शहरात अनेक ठिकाणी पत्रकार संघाच्या सदस्यांना पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.